एकात्मिक बाल विकास सेवायोजना हया केंद्रपुरस्कृत योजनेसाठी पुरक पोषण आहार (SNP) अन्वये अर्थसंकल्पित केलेला निधी खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०१७/प्र.क्र.२९७/का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १५ जानेवारी, २०१८

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभाग,शासन निर्णय क्र. एबावि २०१७/ प्रक्र ११७/का-५, दि.२० मे,२०१७
२) महिला व बाल विकास विभाग,शा. नि क्र. एबावि २०१७/ प्रक्र ११७/का-५, दि.२७ जुलै, २०१७
३) महिला व बाल विकास विभाग,शा. नि क्र. एबावि २०१७/ प्रक्र २४८/का-५, दि. १६ सप्टेंबर, २०१७.

प्रस्तावना :-

महिला व बाल विकास विभागामार्फत एकात्मिक बाल विकास सेवायोजना ही केंद्रपुरस्कृत योजना आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई या कार्यालयाकडून राबविण्यात येत आहे. SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी केंद्र व राज्य हिश्याचे प्रमाण ५०:५० असे ठरविण्यात आलेले आहे.

सन २०१७-१८ साठी SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी रुपये ९९३३०.५६ लाख इतक्या APIP रक्कमेस मान्यता दिली असून त्यामध्ये केंद्र हिस्सा रुपये ४९६६५.२८ लाख व राज्य हिस्सा रुपये ४९६६५.२८ लाख इतक्या रक्कमेचा समावेश आहे.

या योजनेसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता रु.२९६२९.०५ लाख केंद्र हिस्सा व रु.२९६२९.०५ लाख राज्य हिस्सा इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला असून आतापर्यंत केंद्र हिस्सा रु.२४८३२.६४ लक्ष व राज्य हिस्सा रु.२४८३२.६४ लाख असा एकत्रितपणे रुपये ४९६६५.२८ लाख इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यामुळे केंद्र हिस्स्याखाली रु.४७९६.४१ लाख इतक्या रकमेच्या मंजूर APIP च्या मर्यादेत शिल्लक अर्थसंकल्पीत निधी व त्याच प्रमाणात राज्य हिस्सा रुपये ४७९६.४१ लाख असा एकूण रुपये ९५९२.८२ लाख इतका निधी वितरणास मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २८.११.२०१७ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात

आलेल्या निर्णयानुसार प्रस्तुत योजनेचा निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ साठी SNP (पुरक पोषण आहार) या कार्यक्रमासाठी मंजूर APIP च्या मर्यादेत मुख्य सचिवांनी दिलेल्या मंजूरीच्या अधिन ५०% केंद्र हिश्श्याखाली शिल्लक अर्थसंकल्पीत निधी रु. रु.४७९६.४१ लाख व समरुप ५०% राज्य हिस्सा रु.४७९६.४१ लाख याप्रमाणे एकूण रुपये ९५९२.८२ लाख इतका निधी आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांना वितरीत करण्यास व खर्च करण्यास शासन मान्यता देत आहे.

सन २०१७-१८ मध्ये केंद्र व राज्य हिश्याखाली अर्थसंकल्पित केलेल्या व त्यामधुन वितरीत करावयाच्या व खर्च करावयाच्या निधीचा लेखाशिर्षनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

(रुपये लाखात)

लेखाशिर्ष	अर्थ संकल्पित निधी	आयुक्त,ए.बा.विकास सेवा योजना.यांना यापूर्वी वितरीत निधी	आयुक्त,ए.बा.वि.सेवा योजना यांना अर्थसंकल्पीतनिधी पैकी आता वितरीत करावयाचा निधी
२२३६१९२७ **(केंद्र)**	२९६२९.०५	२४८३२.६४	४७९६.४१
२२३६१९३६ **(राज्य)**	२९६२९.०५	२४८३२.६४	४७९६.४१
एकुण	**५९२५८.१०**	**४९६६५.२८**	**९५९२.८२**

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अर्नापचारिक संदर्भ क्रमांक ३ / व्यय ६, दिनांक १२.१.२०१८ अन्वये व त्यांच्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११५१७४८४७५३३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.01.15 17:54:19 +05'30'

(ला.रा.गुजर)

सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मंत्री/राज्यमंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधानपरिषद), विधानभवन,मुंबई.

३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे स्वीय सहाय्य, मंत्रालय, मुंबई-३२
४) सचिव (महिला व बालविकास विभाग), मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई.
७) सर्व जिल्हाधिकारी.
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
९) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास.
१०) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
११) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी/ग्रामीण/आदिवासी).
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई/नागपूर.
१३) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परिषद.
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी मुंबई
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७) कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (का.१४७२)/ वित्त विभाग (व्यय-६) मंत्रालय, मुंबई
१८) कक्ष अधिकारी (का-४) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१९) निवड नस्ती (कार्यासन-५)
